**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव, (प्रतिनिधी) दि. १७ सप्टेंबर : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्षातर्फे 'चला जाणूया नदीला' या विषयावर एकदिवसीय चर्चासत्राचे आयोजन आज विद्यापीठात करण्यात आले.

यावेळी मंचावर कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, रेमन मॅग्सेसे पुरस्कार विजेते जलपुरुष राजेंद्र सिंह, जल बिरादरीचे नरेंद्र चुघ, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. प्रवीण महाले उपस्थित होते. राजेंद्र सिंह यांनी "पाण्याशिवाय जीवन शक्य नाही. २१व्या शतकातील मोठे आव्हान म्हणजे निसर्गाशी असलेले नाते पुन्हा प्रस्थापित करणे," असे सांगितले. नदी स्वच्छ व प्रवाही ठेवली नाही तर आरोग्य, रोजगार, शिक्षण आणि समाजाच्या विकासावर परिणाम होईल, असे त्यांनी नमूद केले.

'नीर, नारी, नदी—नारायणी' या मंत्राचे महत्त्व स्पष्ट करत त्यांनी नदी म्हणजे केवळ वाहणारी जलधारा नसून संपूर्ण जीवनव्यवस्थेचा आधार असल्याचे सांगितले. लोकसहभागातून देशातील २३ नद्या पुनर्जीवित करण्याचे काम झाल्याचे सांगत त्यांनी विद्यापीठातील विद्यार्थ्यांनीही नदी पुनरुज्जीवनाच्या कार्यात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले.

गिरणा नदी परिसरात 'वॉटर सेंच्युरी' उभारण्यासाठी सुमारे ७० विद्यार्थ्यांनी पुढाकार घ्यावा. राष्ट्रीय सेवा योजना व इतर विभागातील विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे काम केल्यास नाल्याचे नदीत रूपांतर करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य घडू शकते, असेही त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी राजेंद्र सिंह यांच्या जलसंवर्धनाच्या कार्याचे महत्त्व अधोरेखित केले. भविष्यात पाण्याच्या उपलब्धतेवरून संघर्ष निर्माण होण्याची शक्यता असून, शाश्वत जलस्रोतांची सद्यस्थिती गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यापीठातील तरुणाईमध्ये मोठी ऊर्जा असून, जज्बा, संयम आणि चिकाटीने काम केल्यास जलसंवर्धनाच्या क्षेत्रात मोठे परिवर्तन घडवता येईल, असे त्यांनी नमूद केले. विद्यापीठाच्या माध्यमातून तिन्ही जिल्ह्यांतील प्रत्येकी एका नदीच्या पुनरुज्जीवनासाठी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांच्या माध्यमातून प्रयत्न करण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रवीण महाले यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन खेमराज पाटील यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. मनोज इंगोले यांनी केले.

**बातमी क्र. २**

जळगाव, (प्रतिनिधी) दि. १७ सप्टेंबर २०२६: आधुनिक युगात भेदभाव, विषमता आणि शोषणाने नवी व अधिक गुंतागुंतीची रूपे धारण केली आहेत. या बदलत्या सामाजिक वास्तवातील नव्या समस्या ओळखून त्यावर नव्या पर्यायांची मांडणी करण्याची गरज आहे. आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर असते तर त्यांनी या नव्या प्रश्नांची चिकित्सा करून नव्या परिवर्तनवादी चळवळीची उभारणी केली असती. या अर्थाने आजच्या काळासाठी 'डॉ. आंबेडकर-2.0' ही संकल्पना महत्त्वपूर्ण ठरते, असे प्रतिपादन बुद्ध तत्त्वज्ञानाचे अभ्यासक व विचारवंत प्रा. अनिल डोंगरे यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील सामाजिकशास्त्रे प्रशाळेच्या डॉ. आंबेडकर विचारधारा विभागाच्या वतीने भैय्यासाहेब उर्फ यशवंतराव आंबेडकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त 'डॉ. आंबेडकर-2.0' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रा. अनिल डोंगरे बोलत होते. यावेळी मंचावर डॉ. आंबेडकर विचारधारा विभागाचे प्रमुख प्रा. राकेशकुमार रामटेके, डॉ. विजय घोरपडे, डॉ. पौर्णिमा वहाने आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रा. डोंगरे यांनी आपल्या व्याख्यानात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची समकालीन संदर्भात चिकित्सा केली, डॉ. आंबेडकरांनी आपल्या काळातील जातीय विषमता, अस्पृश्यता, सामाजिक अन्याय, स्त्री विषयक विषमता आणि शोषण यांच्या विरोधात वैचारिक तसेच सामाजिक संघर्ष उभा केला. संविधानाच्या माध्यमातून त्यांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांना संस्थात्मक अधिष्ठान दिले.

आजच्या काळात मात्र विषमतेचे स्वरूप बदलत असून डिजिटल तंत्रज्ञान, ज्ञान-संसाधनांवरील असमान प्रवेश, शिक्षणातील विषमता, रोजगारातील बदल, आर्थिक दरी, सामाजिक बहिष्करण आणि नव्या प्रकारचे भेदभाव यांसारखे प्रश्न समोर येत असल्याचे ते म्हणाले.

अध्यक्षीय भाषणात सामाजिकशास्त्रे प्रशाळेचे प्रा. उमेश गोगडिया यांनी सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणानंतर वंचित व उपेक्षित समाजाची चळवळ पुढे नेण्याचे महत्त्वपूर्ण कार्य भैय्यासाहेब आंबेडकर

यांनी केले. आपल्या सामाजिक परिवर्तनाच्या कार्यात त्यांनी संविधानिक मूल्ये आणि सामाजिक न्याय या तत्त्वांना अग्रक्रम दिला, असे त्यांनी नमूद केले.

यावेळी डॉ. दिगंबर सावंत, डॉ. समाधान कुंभार, प्रा.विशाल सपकाळे, प्रा. विनेश पावरा, डॉ. शीतल पाटील, डॉ. गोपाल पाटील, प्रा. विरेश पाटील, प्रा. योगेश माळी, प्रा. रोशन मावळे, डॉ. गजानन देशमाने, डॉ. मनोज इंगोले, डॉ. अभय मनसरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. राकेशकुमार रामटेके यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रीतमकुमार सोनवणे यांनी तर आभार विद्यार्थिनी मोनिका लोखंडे यांनी मानले.

**बातमी क्र. ३**

जळगाव, (प्रतिनिधी) दि. १७ सप्टेंबर २०२६ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील व्यवस्थापन प्रशाळेच्या वतीने नव्याने प्रवेशित एमबीए विद्यार्थ्यांसाठी १ ते १२ सप्टेंबर २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या विद्यार्थी प्रेरणा कार्यक्रमाचा समारोप उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना विद्यापीठ व संस्थेची ओळख करून देण्याबरोबरच व्यावसायिक दृष्टिकोन, संवादकौशल्य, नेतृत्वगुण, नैतिक मूल्ये, सामाजिक बांधिलकी आणि करिअरविषयक जाणीव विकसित करणे हा होता.

कार्यक्रमादरम्यान स्वामी विवेकानंदांचे युवक विकासातील योगदान, गुंतवणूक बँकिंग, करिअर विकास, उद्योजकता, कौशल्य विकास, एमबीए पदवीधरांकडून उद्योग क्षेत्राच्या अपेक्षा, सॅप, जीवन जगण्याची कला, विद्यार्थी कल्याण योजना, ताणतणाव व्यवस्थापन, उद्योजकता व विपणन धोरण, शिष्यवृत्ती तसेच प्रशिक्षण व रोजगार मार्गदर्शन या विविध विषयांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले.

कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी स्वामी विवेकानंद केंद्र, जळगावचे संचालक डॉ. पराग जहागीरदार यांनी मार्गदर्शन केले. तसेच जयेश पाटील, डॉ. राजेश जवळेकर, उमाकांत बडगुजर, विष्णू पवार, आदित्य चिंचोकर, निखिल टोके, डॉ. प्रवीण महाले, विजय आहेर, डॉ. नवीन खंडारे, प्लेसमेंट ऑफिसर सोनाली दायमा यांनी विविध विषयांवर विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी व्यवस्थापन अभ्यासशाळेच्या संचालक प्रा. डॉ. मधुलिका सोनवणे तसेच यश शार्दूल, तस्मिया खान, वैभव आहिरे, साक्षी नानोटे, युवराज पाटील यांनी विद्यार्थी समन्वयक म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

समारोप प्रसंगी कुलसचिव डॉ. विनोद पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. सुरेखा पालवे, संचालक प्रा. मधुलिका सोनवणे, प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि एमबीए विद्यार्थी उपस्थित होते.

---

कबचौउमवि / १६/ जनसंपर्कविभाग / २०२६ दि. १७ सप्टेंबर, २०२६

प्रती,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया,उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी,ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता